MHYA020020642022 **श्रीमती +१ .वि. कोणीही नाही**

## किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ४३०/२०२२ मधील निशाणी क्रमांक १ वरील आदेश

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्जदारांचे असे कथन आहे की, मृतक अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार हे अर्जदार क्रमांक १ यांचे पती तर अर्जदार क्र.२ यांचे वडील आहेत. मृतक अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार यांचा मृत्यू दिनांक २४/०८/२०२२ झाला. तसेच अर्जदारा क्र.१ यांची सासु व अर्जदार क्र.२ यांची आजी नामे संतोषबाई अमरलाल मनिहार यांचा मृत्यू दिनांक २३/०९/२०११ रोजी झाला. मयतास अर्जदारांशिवाय कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदारांना शासकीय आणि निमशासकीय कार्यालयीन कामासाठी, वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे मागणी प्रमाणे अर्जदार हे मयत मृतक अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार यांचे कायदेशीर वारस असुन तसे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत विनंती आहे.

**३.** अर्जदार क्रमांक २ यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी ०९ वर दाखल केले आहे. अर्जदारांनी त्यांच्या मागणीच्या पुष्टयार्थ, मृतक अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार व संतोषबाई अमरलालजी मनिहार यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत नि.क्रं.१२ व १३, मयत अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार, अर्जदार क्र.१ व २ यांच्या आधार कार्डची पडताळलेल्या प्रती निशाणी १४ ते १६. प्रस्तुत अर्जाची जाहीर नोटीस दिनांक २३/१०/२०२२ रोजी दैनिक मातृभुमि मध्ये देण्यात आली. त्याची प्रत निशाणी १७ वर आणि पावती निशाणी

१८ वर जोडली. अर्जास विहीत कालावधी मध्ये तसेच आजपर्यंत अर्जदारांच्या अर्जातील मागणीस कोणाचीही हरकत अथवा आक्षेप दाखल झालेला नाही. करीता, अर्जदाराचा पुरावा विनाआव्हानात्मक राहिलेला आहे. अर्जदारांनी ते मयताचे कायदेशीर वारस असल्याचे न्यायालयासमोर शपथेवर सांगितले आहे. त्यांचा पुरावा अविश्वासार्ह आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा या कामी दाखल नाही. सबब अर्ज मंजूर होणस पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी येवुन खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मृतक अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार यांचे पश्चात शासकीय आणि निमशासकीय कामाकरीता, अर्जदार क्रं.१. विद्या अश्वीनकुमार मनिहार व अर्जदार क्र.२ आयुष अश्वीनकुमार मनिहार हे मृतक अश्वीनकुमार अमरलालजी मनिहार यांचे वारस असल्याबाबतचा वारसा दाखला बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे परिशिष्ठ ब प्रमाणे देण्यात यावा.

**ठिकाणः यवतमाळ** **( सु.वि.लाड)**

दिनांक : २८/११/२०२२ २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

यवतमाळ.